# भारतातील ख्रिस्ती मिशनरी संस्थांचा इतिहास

विश्वास गोरखनाथ वळवी
(संशोधक विद्यार्थी)
सामाजिक शास्त्रे प्रशाळा इतिहास विभाग,
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**प्रस्तावना**

**भा**रतात ख्रिस्ती धर्माचा सुरुवातीबरोबरच ख्रिस्ती धर्माचा अनुयायांनी मंडळी (चर्च) मार्फत प्रभु येशुची शिकवण लोकापर्यंत पोहोचवली. संत थोमाने भारतात येऊन सुरुवातीला सात मंडळींची स्थापना केली त्याचा उद्देश विशिष्ठ नव्हता पण आज हीच मंडळी ख्रिस्ती धर्माचे केंद्रस्थान बनलेली आहे. ख्रिस्ती धर्म जसा वाढत गेला तस- तसा या मंडळींमार्फत, अनाथालय, शाळा, वसतिगृहे आणि वेगवेगळया भाषेत बायबलचे भाषांतरे आणि शब्दकोष भारतात तयार करुन प्रभु येशुची शिकवण समाजाचा प्रत्येक अंगात पोहचविण्याचे कार्य या मंडळीने (चर्चने) केलेले आहे.

१८१३ चा सनदी कायद्याने ख-या अर्थाने आधुनिक मिशनरी चळवळीला गती प्राप्त झाली त्याचे कारण ब्रिटीशांचे आर्थिक धोरण नसून या मिशन-यांची सेवाभावी वृत्ती होय म्हणुन विल्बरफोर्स सारख्या... सेवाभावी मिशन-यांचा सांगण्यावरुन ब्रिटीश पार्लीमेंन्टने १८१३ च्या सनदी कायद्याद्वारे मिशन-यांना भारतात ख्रिस्ती धर्मप्रचाराची परवानगी दिली.

भारतीय समाजव्यवस्थेचा कठोर प्रथाना या मिशन-यांनी सामोरे जाऊन धर्मप्रचाराबरोबर समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समाजाला सतीप्रथा, केशवपन, बालविवाह या अनिष्ठ प्रथेतुन मुक्त करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला होता. मिशन-यांची फलश्रुती म्हणजे विसाव्या शतकात साधुसुंदर सिंग, मदर तेरेसा, भगतसिंग, ब्रदर डॅनिएल, पंडीत धर्मविकास शर्मा या मोठया भारतीय मिशन-यांचा उदय झाला. भगतसिंग या कुणी युरोपियन नव्हे तर भारतीय मिशन-याने भारत व भारताबाहेर दहा हजार मंडळींची स्थापना केली म्हणजे आज भारतात युरोपियन मिशन-यांना यायची गरज नाही कारण भारतातील मिशनरी आज ख्रिस्ती धर्माचे सर्वोच्च केंद्र (मंडळी चर्चचा) च्या माध्यमातुन ख्रिस्ती धर्म पुढे नेण्याचे कार्य करीत आहे म्हणुन आज भारतात २.३०% लोकसंख्या ख्रिस्ती आहे.

**२) भारतातील मिशनरी संख्या :-**

१८१३ च्या चार्ट ॲक्ट नुसार जेव्हा मिशन-यांना धर्मप्रचाराची परवानगी देण्यात आली तेव्हा युरोपातील अनेक मिशनरी संस्था भारतात येऊ लागल्या. टीम मिशन, बाप्टीस्ट मिशनरी सोसायटी, डॅनिश मिशनरी सोसायटी, अमेरिकन मिशन सोसायटी अशा अनेक ख्रिस्ती सोसायटीने मिशन-यांमार्फत भारतात धर्मप्रचाराचे कार्य उभे केले ते पुढीलप्रमाणे

**१) डॅनिश मिशनरी सोसायटी :-**

बार्यालोमस जिगनबाल्ग या मिशन-याने डेन्मार्क सोसायटीद्वारे भारतात ख्रिस्ती धर्म प्रचाराचे कार्य केले. " Two years aftr reaching India, Ziegenbalg begain. The translation of New testament into Tamil and finishedition. The 21st March 1711. By 1719 the year of his death.... this earnest and scholarly missioning a number of converts." [1] डॅनिश मिशनरी सोसायटीने भारतात प्रोटेस्टेन्ट ख्रिस्ती धर्माची सुरुवात केली तसेच अनेक भाषेत बायबलचे भाषांतरण तसेच आधुनिक मिशनरी चळवळीचा पाया या सोसायटीने भारतात घालुन दिला.

**२) बाप्टीस्ट मिशनरी सोसायटी :-**

इंग्लंडचा बाप्टीस्ट मिशनरी सोसायटीचा मिशनरी म्हणून विल्यम कॅरी हे भारतात आले आणि या सोसायटीच्या माध्यमातुन त्यांनी भारतात शाळा, बायबलचा छापखाना तसेच अनेक स्थानिक मंडळीची स्थापनी केली. " The society occupies the following station : Calcutta, Serampore, Buckergunga, Jassore, Ducca Allahabad … There are in all about 110 stations and sub- stations …. The Society engages mainly in preaching as distinguished from educational work." [2] बॉप्टीस्ट मिशनरी सोसायटीने लहान मुला-मुलींसाठी दिवस रात्र शाळा तसेच भारतातील जवळ- जवळ एकशे दहा प्रांतात सुर्वाता मोहीमेचे कार्य सुरु करत समाजात आरोग्य, शिक्षण आणि अनेकाविध सुविधांनी सेवेचे कार्य चालु ठेवले.

**३) अमेरिकन मराठी मिशन :-**

अमेरीकन मराठी मिशनने भारतातील महाराष्ट्र या राज्यात महत्वपुर्ण कार्य केले. महाराष्ट्रात ज्ञानोदय मुखपत्रामार्फत ख्रिस्ती धर्माचे सर्वोच्च तत्व आणि धर्मानतरीतांच्या बातम्या आणि लेख छापुन ख्रिस्ती समाजाला जागृत करुन ख्रिस्ती मिशन-यांना धर्मप्रचारासाठी प्रेरीत केले. " The society was organized in Jun 1810 but the first missionaries did not still 11 February 1812 the randed in Calcutta Gordon hall and Samuel Nott. The were at first forbidden to engage in

missionary work at Bombay." [3] अमेरिकन मिशनचे मिशनरी सर्वात पहिले कोलकात्याला आले पण ईस्ट इंडीया कंपनीच्या दबावामुळे त्यांनी धर्मप्रचार केला नाही. १८१३ नंतर गार्डन हॉल याने मुंबईत अमेरीकन मिशनचा झेंडा गाढला आणि आपले धर्मप्रसाराचे कार्य सुरु केले.

**४) टीम मिशन :-**

टीम मिशनने तिबेट, जपान आणि नंतर भारतात येऊन खान्देश या क्षेत्राची निवड करुन धर्मप्रचाराचे कार्य केले "टीम मिशनने भारतात आपले मिशनरी इ.स.१८९२ साली पाठविले ते ३० एप्रिल १८९२ रोजी कलकत्त्यास पोहचले, तिबेटमध्ये जाऊन सुर्वाता सांगण्याची होती पण तिबेटमध्ये त्यांना प्रवेश बंदी होती त्यामुळे भारतात ते योग्य संधीची वाट पहात थांबले होते. "[४] टीम मिशनचे संस्थापक फ्रेडिक फ्रन्सन यांनी स्वत: भारतात येऊन प्रभु येशूची शिकवण द्यायला सुरुवात केली आणि त्यांच्यासोबत ए. ई. शोवर्ग आणि मिस. बी. एलोफसन या मिशन-यांनी देखील ख्रिस्तांचा संदेश गोरगरीबांपर्यंत पोहचविण्याचे महत्वपुर्ण कार्य केले.

**५) मिशनरीज ऑफ वुमन सोसायटीज :-**

मिशनरी सोसायटीच्या माध्यमातुन अनेक ख्रिस्ती कन्या (Bible Women) भारतात येऊ लागल्या. या ख्रिस्ती कन्या ओरपनस, शाळा, अनाथालये, वसतिगृह आणि मंडळी या ठिकाणी सुपरीटेन्डन्स, नन, शिक्षिका आणि पास्टर रेव्ह, बिशप याचा सहाय्यक म्हणुन काम करत होत्या ज्यामध्ये मदर तेरेसा, मिस पारकर, मिस हार्ट, मिस ई. जी. गार्डन, मिस एम. एम. हुक्स, मिस स. फ. नुरी या बायबल वुमन्सजी अनेक मिशन-यांसोबत सहाय्यक म्हणुन ख्रिस्ती धर्मप्रचारात महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे.

अशा प्रकारे भारतात अनेक मिशनरी सोसायटीने मिशन, मिशन-यांचा माध्यमातुन ख्रिस्ती धर्मप्रचार घडवुन आणला. काही सोसायटीने बायबलचे वेगवेगळया भाषेत भाषांतरे केली तर काही सोसायटीने अनेक भाषात बायबलचे शब्दकोष तयार केले तर काही सोसायटीने शाळा, बायबलची शाळा, वसतीगृहे आणि अनेक सामाजिक संस्था काढुन प्रभु येशूची सुर्वाता जनसामान्यांपर्यंत पोहचविली तसेच या सोसायटीच्या माध्यमातुन अनेक स्त्रियांनी आपले संपुर्ण जीवन सेवेमध्ये वाहीले आणि म्हणुनच आज भारतात महत्वाच्या ठिकाणी म्हणजे गावात, तालुक्यात, जिन्हात आणि प्रांतात ख्रिस्ती मिशन-यांचे सर्वोच्च केंद्र मंडळी कार्यरत आहे.

**६) १८१३ चा सनदी कायदा :-**

ईस्ट इंडिया कंपनीचा विरोध असतांना सुध्दा ब्रिटीश पार्लमेन्टने १८१३ च्या सनदी कायद्याने मिशन-यांना भारतात ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी परवानगी देण्यात आली त्यामुळे भारतात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, स्विडन या देशातुन अनेक मिशनरी संस्था आणि मिशन-यांचा मोठा लाट भारतात येऊ लागला. या मिशन-यांच्या लाटेमुळे भारताचा आध्यात्मिक इतिहासाला वेगळे वळण प्राप्त झाले. . " The East India Company Actt 1813, also know as the Charter Act of 1813 was an act of the parliament of the untited kingdom…. This act permitted Christian missionaries to propagate English and preach the religions ." [5] ख्रिस्ती मिशन-यांसाठी हा कायदा म्हणजे मॅग्नाचार्टा होय. या कायद्यामुळे भारतात गावो-गावी आणि भारताचा ज्या ठिकाणी सरकार पोहचु शकत नाही अशा ठिकाणी या मिशन-यांनी पोहोचुन मंडळीद्वारे समाज प्रबोधन घडवुन आणले हे समाजप्रबोधन आरोग्य, शिक्षण, सेवा, प्रेमभाव याचा माध्यमातुन मिशन-यांनी घडवुन आणले. "Church was phaced under a Bishop which was maintained from Indian revenue Englishman were granted permission to settle and hold land in India. To the missionaries for introducing useful knowledge and propagating religious….. lawful purposes, under a system of licenses." [6] प्रारंभी मिशन-यांची मंडळी (चर्चचा) माध्यमातुन सेवाभावी संस्था काढल्या ज्याचा सर्वोच्च बिशप असायचा. १८१३ च्या सनदी कायद्याने हाच बिशप सर्वोच्च बनला. मंडळीचा बिशप म्हणून प्रत्येक सोसायटीने भारतात ज्या ठिकाणी मंडळींची स्थापना होत असे त्या मंडळीचा एक सर्वोच्च बिशप म्हणून अनेक नियुक्त्या करत गेले. "कंपनी सरकारने ख्रिश्चन मिशन-यांच्या बाबतीत असलेले आपले धोरण बदलावे. मिशन-यांला काही प्रमाणात सवलती द्याव्यात असा आग्रह विल्बर फोर्स या मिशन-यांने इंग्लंडमध्ये ब्रिटीश सरकारकडे धरला.... १८१३ च्या सनदी कायद्यात कंपनी सरकारने ख्रिश्चन मिशन-यांना काही सवलती द्याव्यात अशी तरतुद करण्यात आली."[७] बिल्बर फोर्स या मिशन-यांच्या प्रयत्नाने फक्त इंग्लंडचाच मिशन-यांना नाही तर अनेक युरोपियन देशातील ख्रिस्ती मिशन-यांना भारतात ख्रिस्ती धर्मप्रचाराची मुभा देण्यात आली.

थोडक्यात ईस्ट इंडीया कंपनी आणि ख्रिस्ती मिशन-यांची धोरणे वेगवेगळी होती. एकाची आर्थिक पिळवणुक तर दुस-यांची सामान्य माणसाला शिक्षित करुन आर्थिक स्वावलंबत्व प्रारंभ करुन देणे आणि आणि ईस्ट इंडिया कंपनीचा विरोध असतांना देखील ब्रिटीश पार्लमेन्टमुळे ईस्ट इंडिया कंपनीला मिशनरी संस्थाना भारतात परवानगी द्यावी लागली ज्यामुळे ख्रिस्ती लोकसंख्या भारतात वाढु लागली.

**७) भारतातील ख्रिस्ती लोकसंख्येचे प्रमाण :-**

भारतात ख्रिस्ती लोकसंख्येचे प्रमाण फार महत्वाचे आहे कारण हा समाज भारताच्या प्रत्येक अंगात वावरत असतो. समाजातील असा कोणताही अंग सुटला नसेल जेथे ख्रिस्ती समाज आढळत नाही. संत थोमा हा भारतात येणारा पहिला तर वर्थलमय दुसरा ख्रिस्ती मिशनरी होय. भारताचा इतिहासात या दोघांपासुन आपण ख्रिस्ती लोकसंख्या मोजु शकतो. "२००२ च्या जनगणनेनुसार भारतात २४.१ दशलक्ष ख्रिश्चन बांधव असुन हे प्रमाण भारताच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत २.३ टक्के आहे. केरळमध्ये ख्रिश्चनांची

लोकसंख्या २५.१५ टक्के, तामिळनाडु १५.७२, कर्नाटकात ४१९ तर आंध्रप्रदेशातील ४.९ टक्के नागरिक ख्रिश्चन आहेत. या चार राज्यातील ख्रिश्चनांची गाळाबेरीज एकूण लोकसंख्येच्या ५४.३४ टक्के आहे."[८] दक्षिण भारतात ख्रिस्ती धर्माची लोकसंख्या जास्त आढळली. कारण संत थोमा, हिजकीया फ्रान्सिस, ब्रदर डॅनिएल, भगतसिंग, डी.जी. एस दीनाकरण अशा ख्रिस्ती भारतीय मिशन-यांचा जन्म आणि कार्यभुमी दक्षिण होती तसेच भारतातील पहिल्या सात मंडळीची स्थापना संत थोमाने केरळ म्हणजे दक्षिणेत केली. " Christianity has emerged as the major religion in three North Eastern States namely, Nagaland, Mizoram and Meghalaya among other status/ uts. Manipur (34.0%), Goa (207%) and Arunachal Pradesh (18.7%) have considerable percentage of christian population to the total population of state/UT."[9] २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ख्रिस्ती समाजाची लोकसंख्या २.३०% आहे. तसेच भारतातील उत्तर- पुर्व राज्यात जसे गोवा, नागालँड, मिझोराम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेश या राज्यात ख्रिस्ती धर्माची लोकसंख्या जास्त आढळते.

भारतात कॅथलीक आणि प्रोटेस्टन्ट सोडले तरी अनेक उपपंथ या दोन ख्रिस्ती पंथातुन निर्माण झालेले आहे आणि या पंथांचे जाळे अनेक मंडळीचा वेगवेगळया नावाने संचालित होत असल्याने ख्रिस्ती लोकसंख्या सांगणे फारच अवघड आहे. "ऑपरेशन वर्ल्ड या संस्थेनुसार भारतातील ख्रिश्चनांचे कॅथलिक, प्रोटेस्टंट, आथोडॉक्स आणि स्वतंत्र असे चार गट करता येतात. २००१ मध्ये २९.२ टक्के कॅथलीक ३९ टक्के प्रोटस्टंट, ३.८ ऑथोडाक्स आणि २७.६ टक्के स्वतंत्र ख्रिश्चन नागरीक आहे." [१०] प्रोटेसेक्ट ख्रिस्ती गटाची भारतात सर्वात जास्त संख्या असुन दुसरा गट कॅथलीक दुस-या स्थानावर आहे. ऑथोडाक्स सिध्दांतवादी असुन चोथ्या गटाला स्वतंत्र्य म्हटले गेले आहे या गटातील ख्रिस्ती लोकसंख्या ही खेडयापाडयात स्थानिक मंडळीद्वारे संचालीत केली जाते या मंडळीची जेव्हा भौतिक प्रगती होते. तेव्हा ती सर्वात जास्त प्रोटेस्टंट गटात तर काही प्रमाणात कॅथलीक गटात सम्मिलीत होत असते.

तसेच भारतात या चार गटाचे वेगवेगळया उपगटात रुपांतरण होते. प्रोटस्टंट गटात न्यु लाईफ फेलोशिफ शालोम फेलोशिप चर्च, ल्युथरन चर्च, इंडीयन ब्रदरस इव्हन्जीलीकल चर्च कॅथलिक गटात वेस्टसिरीया मलबार, मलबार चर्च रोमन कॅथलीक, आर्थोडॉक्स गटात मलान्करन चर्च, जेकोबिट चर्च आणि स्वतंत्र्य गटात community in Christ, Christian revival church, gift of God ministries अशा अनेक चर्चच्या (मंडळीचा) समावेश या गटात होत असतो.

भारतातील ख्रिस्ती लोकसंख्या या चार गटात विभागललेली असून या गटांची संख्या मंडळींद्वारे संचालीत होते. ज्यात या मंडळीचे सभासद आणि प्रत्येक मंडळीची पुर्ण संख्या आणि या गटाचा ज्या उपगटात विभागणी झालेली आहे. त्याची संख्या यावरुन भारतातील ख्रिस्ती लोकसंख्येचे प्रमाण ठरवता येते.

**संदर्भग्रंथ सूची :-**


1) Indian missionery Directory, Dev B. H. Badley, Methodist Episcopal church press publication Lucknow, Reviseedition, 1881 archive.org/details/indianmissioneryoobadlidla pp:2
2) Indian missionery Directory, Dev B. H. Badley, Methodist Episcopal church press publication Lucknow, Reviseedition, 1881 archive.org/details/indianmissioneryoobadlidla pp:13
3) Indian missionery Directory, Dev B. H. Badley, Methodist Episcopal church press publication Lucknow, Reviseedition, 1881 archive.org/details/indianmissioneryoobadlidla pp:51
4) सुर्वातीकाचा पाऊलखुणा, आ.स.ना. सुर्यवंशी, इंव्हॅजेनिकल अलायन्स मिनिस्टिीज प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.३७६
5) Wikipedia.org/wikilcharter-Act-of-1813, Aec 1:16pm 9/19/17
6) Indianetzone.com/24/The-charter-act-1813.htm 12:9 pm 9/19/17
7) महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, जी. एल. भिडे, एल. की. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापूर, बाविसावी आवृत्ती, २०१३, पृष्ठ क्र. ३५
8) चर्चचे वास्तव, चारुदत्त कडु, विजय प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृष्ठ क्र.५
9) censusindia.gov.in.ac 12:04pm, 9/29/2017
10) चर्चचे वास्तव, चारुदत्त कडु, विजय प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृष्ठ क्र.६